## निशाणी क्र.५ खालील आदेश

### (उषा बाळू तलावडे विरुध्द बाळू उर्फ सुरज दत्तू तलावडे व इतर)

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी रक्कम रुपये ३०,००० मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज नि. क्र. ५ वाचला. सामनेवाला यांना नोटीसची बजावणी होउन देखील त्यांनी प्रस्तुत अर्जास उत्तर दाखल न केल्यामुळे प्रस्तुत अर्ज विना म्हणणे व विना कैफियत चालविण्यात आला.

३. अर्जदाराचे विद्वान वकिल श्रीमती आरती भोईरकर यांचा युक्तिवाद ऐकला.

४. अर्जदाराचे विद्वान वकिल यांनी असा युक्तिवाद केला की अर्जदार व सामनेवाला क्र. १ बाळू तलावडे यांचा विवाह दि.२ मे २०१८ रोजी मौजे करंजाळे ता.जुन्नर जि. पुणे येथे संपन्न झाला व लग्नानंतर अजर्दार ही सामनेवाला क्र. १ यांच्या घरी एकत्र कुटुंबात नांदावयास गेली असता अर्जदाराला घरातील सर्व कामे एकटीस करावी लागत असत व लग्नानंतर १५ दिवसांनी शेतीतील कामे करण्यास जाउ लागली होती. अजर्दाराला शेतीबाबत काहीही माहिती नसून देखील तिने काम करण्यास नकार दिला नाही. परंतु अर्जदार ही लग्नानंतर पहिल्या दिवाळीसाठी माहेरी गेली असता रात्री अर्जदारास लघवीचा असह्य त्रास होत असल्याने डॉक्टरांनी तिला सोनोग्राफी करावयास सांगितली होती. अर्जदार ही सासरी गेली असता तिच्या सासरच्या लोकांनी तिची सोनोग्राफी केली नाही व तिच्या आजारपणाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे अर्जदाराची किडणी खराब झाली व त्यामुळे किडणीमध्ये मुतखडे झाले होते. परंतु सामनेवाला यांना ऑपरेशनचा खर्च करावा लागू नये म्हणून सामनेवाला यांनी अर्जदारास माहेरी राहून ऑपरेशन करावयास सांगितले. दि. ०४.१२.२०१८ रोजी अर्जदार हिचे वसई येथिल ईशान हॉस्पीटल मध्ये किडणीचे ऑपरेशन झाले व त्या ऑपरेशला एकूण ५.००.०००रु. खर्च आला व सदरचा खर्च हा अर्जदारांच्या वडिलांनी केला.

५. अर्जदाराचे विद्वान वकिल यांनी पुढे असा युक्तिवाद केला कि सामनेवाला

क्रमांक १ ते ३ यांनी अर्जदाराची कधीही भेट घेतली नाही व तिच्या आजारपणाबद्दल कोणतीही विचारपूस केली नाही. त्यानंतर अर्जदार ही १५.०३. २०१९ रोजी सासरी परत गेली असता सामनेवाला क्र. २ सासू इंदूबाई तलावडे ही अर्जदारास त्रास देउ लागली व लहान सहाण गोष्टींवरुन अर्जदारास टोमणे मारत असे व अर्जदारास म्हणत असे की माझ्या मुलाचे आयुष्य् खराब केले. तू माझ्या मुलाच्या संसाराचे वाटोळे केले. असे म्हणून शारिरीक व मानसिक त्रास देत असे व सदरची बाब ही अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ यास सांगितली असता सामनेवाला क्र. १ हा तिच्या बोलण्याकडे लक्ष देउ नको असे म्हणत असे.

६. सामनेवाला यांनी अर्जदारास तिच्या लग्नापासून शारिरीक आर्थिक व मानसिक छळ करुन अर्जदाराला तिच्या माहेरुन कोणत्या ना कोणत्या कारणाने पैशाची मागणी करीत असत व सदर मागणी अर्जदारांनी पूर्ण न केल्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदारास शारिरीक व मानसिक छळ केला त्यामुळे अजदर्रार हिने दि. ०५.१२.२०२४ रोजी सामनेवाला यांच्याविरुध्द वडगाव मावळ पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल केली व तेव्हापासून अर्जदार ही तिच्या वडिलांच्या घरी राहत आहे.

७. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व अर्जदार हिची शारिरीक परीस्थीती खूप खालावलेली आहे. याउलट सामनेवाला क्र. १ यांचे मौजे कोंडीवडे येथे स्वतःचे पॉली हाउस आहे व ते पोल्ट्रीचे देखील काम करतात व त्यांना शेती देखील आहे व शेतीमधून ते दरमहा १.५ लाख रु. उत्पन्न घेतात. तसेच पॉली हाउस मधून दरमहा ५०.००० ते ६०.००० रु. उत्पन्न घेतात त्यामुळे अर्जदार हिच्या वैदयकिय खर्चाकरिता व इतर खर्चाकरिता मासिक ३०.००० रु पोटगी मिळणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करावा असा युक्तिवाद केला.

८ अर्जदारांच्या वकिलांचा युक्तिवाद लक्षात घेता व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अर्जदाराने नि. क्र. ३ कडे तिच्या लग्नाची लग्न पत्रिका दाखल केली आहे. सदर लग्नपत्रीकेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अर्जदार व सुरज यांचा विवाह दि. ०२.०५.२०१८ रोजी झाल्याचे दिसून येते सबब अर्जदार व सामनेवाला क्र. १ हे पती पत्नी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून

येते.

९ अर्जदाराने तिच्या अर्जातील कौटुंबिक हिंसाचाराबाबतची स्पष्ट कथने तिने अर्जामध्ये केलेली आहे तसेच सदर कथनाच्या पुष्टयर्थ तिने नि. क्र. ६ कडे शपथपत्र दाखल केले आहे तसेच नि. क्र. ११ कडे संरक्षण अधिकारी ता. वडगाव मावळ यांचा कौटुंबिक हिंसाचाराचा घटना अहवाल दाखल केला आहे. सदर कौटुंबिक हिंसाचार घटना अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदर घटना अहवालामध्ये अर्जदारावर होत असलेल्या कौटूंबिक छळाबद्दल स्प्ष्ट कथने केलेली आहेत. सबब सामनेवाला यांनी अर्जदाराचा कौटूंबिक छळ केला हे प्रथमदर्शनी दिसून येते.

१० अर्जदाराचे असे म्हणणे आहे की सामनेवाला क्र. १ याचे मौजे कोंडीवडे येथे स्वत्ःचे पॉली हाउस चालवतो व त्यास दरमहा ५० ते ६० हजार रुपये उत्पन्न् मिळते परंतु अर्जदाराने सामनेवाला क्र. १ यांच्या पॉली हाउसबद्दल कोणतेही कागदोपत्री पुरावे दाखल केले नाही. असे असले तरी अर्जदार हिने नि. क्र. १४ कडे दाखल केलेल्या मालमत्ता आणि देयकाच्या प्रतिज्ञापत्रमध्ये सामनेवाला क्र. १ हा पॉल्ट्री फार्ममध्ये काम करत असल्याचे व त्यातून त्याला दरमहा २० ते ३० हजार रुपये इतके उत्पन्न मिळत असल्याबद्दल स्प्ष्ट कथन शपथेवर केलेले आहे व सामनेवाला क्र. १ यांच्याकडे वडिलोपार्जित शेती असून त्यातून त्यांना १.००.००० रुपये उत्पन्न मिळत असल्याबद्दल देखील तिने शपथेवर सांगितले आहे तसेच सामनेवाला क्र. ३ दत्तू तलावडे यांच्याकडे शेती असल्याबद्दल गट क्र. ११६ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. सदर ७/१२ च्या उतार्यावरुन असे दिसून येते की सामनेवाला यांच्याकडे शेती आहे व त्यांना वार्षिक १.००.००० रु. उत्पन्न मिळते.

११ सामनेवाला यांनी कोर्टात हजर होउन अर्जदाराच्या अर्जातील कथने नाकारलेली नाहीत तसेच त्यांनी त्यांचे संपतीचे शपथपत्र देखील दाखल केले नाही. सबब त्यांच्याविरुध्द प्रतिकूल तर्क काढला जाउ शकतो.

१२ अर्जदाराने तिच्यावर होत असलेल्या कौटुंबिक हिंसाचाराबद्दल प्रथमदर्शनी सिध्द केलेले असल्यामुळे ती अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र असल्याचे दिसून येते.

१३ अर्जदाराच्या वैदयकिय उपचाराचा तसेच तिच्या दैनंदीन खर्चाचा व राहणीमानाचा विचार करता तसेच सामनेवाला यांच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार करता अर्जदारास मासिक १०,००० रु पोटगी मंजूर करणे मला योग्य व न्यायाचे वाटते सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२ सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदारास अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रु.

१०, ००० प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावेत.

३ प्रस्तुत आदेशाची प्रत ही संरक्षण अधिकरी वडगाव मावळ तसेच वडगाव मावळ पोलिस स्टेशन यांना अंमलबजावणीसाठी पाठविण्यात यावी.

४ प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

ठिकाणः वडगाव मावळ

दि.२२.११.२०२४

VISHNU RAMCHANDRA DOIFODE

Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2024.12.12 10:29:53 +0530

(श्री. व्ही. आर. डोईफोडे)

४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

वडगाव मावळ, पुणे

**CERTIFICATE.**

I affirms that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : M. B. Ingole |
| Court Name | : Shri. V. R. doifode,<br>4th Judicial Magistrate ,<br>Vadgaon Maval, Pune. |
| Date of order | : 22.11.2024 |
| Order signed by P.O. on | : 22.12.2024 |
| Order uploaded on | : 12.12.2024 |